**प्रेस नोट**

जा.क्र.पोउआ/वाहतूक/ ८३१ /२०२०

पिंपरी चिंचवड शहर दिनांक २५/०२/२०२०

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी वाहतूक विभागाचे हद्दीत अहिल्यादेवी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या सर्व्हीस रोडवर पिअरवर सेगमेंट टाकण्याचे काम चालू आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. ०१९६/८७१/सी आर -३७/ टी आर ए – २ दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशनुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेलया अधिकाराचा वापर करुन सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त,वाहतूक पिंपरी चिंचवड शहर सदर रस्त्यावरील मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे तात्पुरते बदल करण्यात येत आहेत.

**पिंपरी वाहतूक विभाग, पिंपरी चिंचवड अंतर्गत**

- रात्रौ २३.०० ते पहाटे ०५/०० पर्यंत अहिल्यादेवी चौकातून पुण्याकडे जाणारी वाहतूक सरळ न जाता उजवीकडे होंडा शोरुम समोरुन पिंपरी ब्रिजचे लगत – क्रोमा शोरुम समोरुन पुन्हा डावीकडे वळून ब्रिजचेलगत डावेबाजूने थायसन क्रुप कंपनी समोरुन आंबेडकर चौकात वळविणार आहेत.

तरी वरील वाहतूक बदलाबाबत मेट्रोकडील मार्शल व वाहतूक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर, वाहतूक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(सुधीर हिरेमठ)भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रतः-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक पिंपरी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार/ प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करुन त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टसह दोन दिवसात सादर करावी.

४) एक्झक्युटीव्ह डायरेक्टर महाराष्ट्र मेट्रो रेल कॉरर्पोरेशन लि.पुणे

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned by CamScanner